



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २०२, मंगळवार २३ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मोदींच्या गॅरंटीवर जनतेचा विश्वास

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन ■ खा.डॉ.सुजय विखेंचा उमेदवारी अर्ज दाखल



**नगर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र मजबूत झाला तरच देश मजबूत होईल, मोदींच्या विकासाचे यान चंद्रावर पोहचले आहे. मात्र राहुल गांधीचे यान अद्यापही लाँच होऊ शकले नाही. महाविकास आघाडीचे कुणी आले तरी विजय सुजय विखेंचाच होईल, कारण आता जनतेचा विश्वास फक्त मोदी गॅरेंटीवर असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.डॉ. सुजय विखे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सभेत ते बोलत होते.**

अहिल्यानगर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर आयोजित केलेल्या जाहीर सभेत राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर, महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. प्रा.राम शिंदे, आ. संग्राम जगताप, माजी अरूणकाका जगताप, आ. मोनिका राजळे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख बाबुशेठ टायरवाले,भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, शहराध्यक्ष अभय आगरकर, रिपाईचे भैलुमे यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे, रिपब्लिक पार्टी आठवले गट तथा मित्र पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

सभेच्या पुर्वी महायुतीच्या वतीने नगर शहरातील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आलेल्या प्रचार फेरीतून डॉ. सुजय विखे पाटील यांनी भव्य शक्ती प्रदर्शन केले.फेरीपुर्वी डॉ.सुजय विखे पाटील यांनी शहरातील सर्व महापुरूषांना विनम्र अभिवादन केले.या रॅलीमध्ये महिला युवक, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दिल्लीगेट चौकात या रॅलीचा समारोप झाला.

त्यानंतर झालेल्या सभेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिदे म्हणाले की,ड्रामा करून कुणी निवडून येत नाही. विखे परिवाराला समाजकारणाची मोठी परंपरा आहे. स्व डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात मोठे योगदान असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी विठ्ठलरावांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांचा वारसा स्व. बाळासाहेब विखे यांची पुढे नेला,तर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्याचा वटवृक्ष केला.आणि सुजय विखे हा वारसा अविरत चालवत आहेत. यामुळे सुजय विखे हे सर्वांच्या सुखादुखात धावून जातात. त्यांना तरूणांच्या प्रश्नांची जाण आहे. त्यांनी जिल्ह्याचे तसेच महाराष्ट्रातील अनेक प्रश्न मोठ्या प्रभावीपणे लोकसभेत मांडले आहेत. यामुळे ज्याच्या नावातच जय आहे त्याचा पराभव अशक्य आहे. डॉ. विखे खासदार झाल्यावर ते पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या टीममध्ये सामील होणार आहेत. यामुळे नगर जिल्ह्याचा विकास जलद गतीने होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या सभेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात इंडीया आघाडीचा चांगलाच समाचार घेतला. फडणवीस म्हणाले की, महायुती सरकार ही विकासाची गाडी असून त्याला वेगवान पंतप्रधान मोदी यांचे इंजिन आहे. तर दुसरीकडे इंडीया आघाडीत सर्वच स्वता:ला इंजिन समजतात. राहूल गांधी, उध्दव ठाकरे, शरद पवार, ममता बॅनर्जी, असे सर्वच नेते आपल्याला इंजिन समजत असल्याने इंजिनमध्ये केवळ ड्रायव्हरला बसायला जागा असते. सर्वसामान्यांना इंजिनमध्ये बसता येत नाही. राहूल सोनिया गांधीच्या इंजिनमध्ये राहूल गांधी बसतील होतील, शरद पवारांच्या इंजिनमध्ये सुप्रिया सुळे बसतील तर उध्दव ठाकरेंच्या इंजिनमध्ये आदित्य ठाकरे असतील अशी मार्मिक टिका करून दुसरीकडे मोदींच्या विकासाच्या इंजिनला भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे, आणि इतर मित्र पक्षांचे डबे आहेत. तिथे सर्वांना बसण्यासाठी जागा आहे. मोदींच्या गॅरंटीमध्ये सबका साथ सबका विकास हे धोरण आहे. त्यामुळे नगर जिल्ह्याच्या विकासासाठी डॉ.सुजय विखे यांचा डबा मोदींच्या गाडीला जोडण्यासाठी १३ मेला मोठ्या मताधिक्याने सुजय विखे यांना मतदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. या प्रसंगी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले.तर खा. डॉ, सुजय विखे पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# आ. नीलेश लंके मंगळवारी साधेपणाने अर्ज दाखल करणार

## महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित राहणार

**नगर : प्रतिनिधी**

**आ. नीलेश लंके हे नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात मंगळवार दि. २३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज साधेपणाने दाखल करणार आहेत. मतदारसंघातील आजी माजी आमदार, महाविकास आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार असल्याची माहिती लंके यांच्या संपर्क कार्यालयाकडून सांगण्यात आले.**




सन २०१९ मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीतही लंके यांनी शक्तीप्रदर्शन न करता अंध, अपंग, विधवा, परित्यक्त्यांच्या हस्ते आपला अर्ज दाखल केला होता. तशाच पध्दतीने सन २०२४ च्या लोकसभा निवडणूकीतही लंके हे कोणतेही शक्तीप्रदर्शन करणार नाहीत.

गेल्या दोन वर्षांपासून लोकसभा निवडणूकीची तयारी करणाऱ्या आ. नीलेश लंके यांनी निवडणूक दृष्टीपथात आल्यानंतर शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून राणीताई लंके यांनी मतदारसंघातील गावागावांमध्ये जात शिवविचार पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्या निमित्ताने लंके हे घरोघर पोहचले. त्यापूर्वीही दिवाळी फराळाच्या निमित्ताने लंके यांनी मतदारंसघातील प्रत्येक गावच्या प्रमुख कार्यकर्त्यांना हंगे येथे निमंत्रीत करून संवाद साधला होता. अलिकडेच नगर शहरात शिवपुत्र संभाजी या खा. डॉ. अमोल कोल्हे यांच्या महानाटयाच्या प्रयोगाचे आयोजन करून लंके हे लाखो मतदारांपर्यंत पोहचले. महानाटयाच्या पहिल्या दिवसापासून या प्रयोगांना लाखो नागरीकांनी हजेरी लावल्याने हे महानाटय कमालीचे यशस्वी ठरले. विशेष म्हणजे भाजपासह सर्वपक्षीय नेत्यांनी या महानाटयास हजेरी लावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

शरद पवार गटामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्यानंतर लंके यांनी कार्यकर्त्यांची मने जाणून घेत तांत्रीक अडचण नको म्हणून थेट आपल्या आमदारकीचा पक्षाकडे सुपूर्द करून लंके हे मैदानात उतरले. स्वाभीमान जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने लंके हे मतदारसंघातील गावागावांमध्ये पुन्हा पोहचले. लंके यांची ही जनसंवाद यात्राही कमालीची यशस्वी झाली. रात्री दहा वाजता यात्रेचा समारोप अपेक्षीत असताना लंके हे पहाटे तीन वाजेपर्यंत गावागावांना भेटी देत होते. उशिरापर्यंत नागरीक लंके यांची वाट पाहत असल्याचे चित्र गावोगावी दिसून येत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांच्यासह जिल्हयातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत नगर शहरात या यात्रेचा समारोप झाला. या सांगता सभेलाही मोठा प्रतिसाद मिळाला. महाविकास आघाडीचे जिल्हयातील नेते एकसंघपणे लंके यांच्या पाठीशी असल्याचा संदेश या सांगता सभेतून देण्यात लंके हे यशस्वी झाले. या पार्श्वभुमीवर लंके हे आपला उमेदवारी अर्ज मंगळवारी दाखल करणार आहेत.

### अर्जापूर्वीच लंके घराघरात पोहचले

**निवडणूक जाहिर झाल्यानंतर लंके यांनी काढलेल्या जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने घरोघर पोहचले आहेत. लंके यांचे सहकारीही गावागावांमध्ये तळ ठोकून असून ते मतदारांपर्यंत पोहचत आहेत. अर्ज दाखल करण्यापूर्वीच लंके हे घराघरापर्यंत पोहचले असून प्रत्यक्ष निवडणूक सुरू झाल्यानंतर विविध सभांच्या माध्यमातून लंके हे वातावरण आणखी तापविण्याचा प्रयत्न करतील.**

# दुष्काळी तालुका ही ओळख पुसणार

## ■ राधाकृष्ण विखे यांची ग्वाही ■ टाकळी ढोकेश्वर येथे प्रचार सभा संपन्न

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**पिंपळगांव जोगा प्रकल्पाचे पारनेर तालुक्याचे हक्काची पाणी मिळालेच पाहिजे अशी आग्रही मागणी करतानाच कान्हूरपठार उपसा योजना मार्गी लागली असून पारनेर तालुक्याची दुष्काळी तालुका ही ओळख पुसण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याची ग्वाही राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.**



■ खा.डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची टाकळी ढोकेश्वर येथे सभा पार पडली.

टाकळी ढोकेश्वर येथे सुजित झावरे पाटील मित्र मंडळ, देवकृपा फाउंडेशनच्या वतीने भाजपाचे नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत मंत्री विखे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना विखे म्हणाले, सुपा एमआयडीसी मध्ये भुमिपुत्रांना रोजगार मिळवून देण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येईल. ही निवडणूक देशाचे भवितव्य घडविणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्याला तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे असल्याने सर्वांनी भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांना मतदान करण्याचे आवाहन विखे यांनी केले.

यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, आम्ही सर्व ताकदीने खा. सुजय विखे यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे असून त्यांना पारनेर तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य देऊ अशी ग्वाही पाटील यांनी दिली. यावेळी पुणे जिल्याचे नेते मंगलदास बांदल यांनी चौफेर टीका करीत उपस्थितांचे लक्ष वेधले.

मंत्री विखे यांचे सुजित झावरे पाटील यांच्या वतीने टाकळी ढोकेश्वर येथे जोरदार स्वागत करण्यात आले. टाकळी ढोकेश्वर गावातून विखे यांची ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजीत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीमध्ये मोठया संख्येने युवक सहभागी झाले होते.

यावेळी ज्येष्ठ नेते सिताराम खिलारी, विनायक देशमुख, अण्णासाहेब बाचकर, मा. सभापती बाबासाहेब तांबे, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, मा. सभापती गणेश शेळके, युवा नेते सचिन वराळ, मा. सभापती अरूण ठाणगे, निजाम पटेल, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, पंचायत समितीचे सदस्य दिनेश बाबर, शहाजी कवडे, बबनराव पवार, मनसेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब माळी, योगेश रोकडे, राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले, डॉ. भाऊसाहेब खिलारी, डॉ. किशोर ढोकळे, नगरसेवक युवराज पठारे, पंचायत समितीच्या सदस्या सुप्रिया साळवे, सतिश पिंपरकर, भाजपा किसाना मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे, यांच्यासह सुजित झावरे पाटील मित्र मंडळ, देवकृपा फाउंडेशनचे पदाधिकारी, पारनेर तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी, युवक, महिला यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

### सुजितराव उद्याचा दिवस तुमचा

**सुजितराव कंबर कसा, उद्याचा दिवस तुमचा आहे. हातपाय आखडायचे नाही. उतरायचं तर पुर्ण ताकतीने उतरा. तुमच्या पाठीशी मी संपूर्ण ताकद उभी करायला तयार आहे हे मी तुम्हाला जनतेच्या साक्षीने सांगतो.**

**राधाकृष्ण विखे,** पालकमंत्री

### सुजितराव आमच्याशी दोस्ती करून पाहा

**उद्या कोणीतरी वरचे साहेब येतील पुण्याचे. सुजितरावांना बोलवून घेतील. तु काळजी करू नको. तुझे बरोबर करतो असे सांगतील. मात्र ते असे म्हटल्यावर तुमचा कार्यक्रम झालाच समजायचं. तुम्हाला ते सांभाळणारच नाहीत. स्वर्गीय वसंतराव झावरे पाटलांचा त्यांनी स्वतःच्या राजकारणासाठी वापर केला. तुमचाही केला. आता मात्र तुम्ही शहाणे झाला हे बरं केलं. तुम्ही त्यांच्याशी दोस्त करून पाहिली तुम्ही आता आमच्याशी दोस्ती करून पहा असे सांगत मंत्री विखे यांनी सुजित झावरे पाटील यांना साद घातली.**

# मिलिंद नार्वेकरांना शिंदे सेनेची ऑफर ?

## दक्षिण मुंबईतुन लढण्याचा प्रस्ताव

**मुंबई :प्रतिनिधी**

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव मिलिंद नार्वेकर यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ऑफर दिल्याची चर्चा पुन्हा सुरु झाली आहे. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून एका नार्वेकरांच अर्थात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचं नाव भाजपकडून चर्चेत होते. इतक्यातच आता शिंदे यांच्या शिवसेनेने मिलिंद नार्वेकरांना दक्षिण मुंबईतून लढण्याचा प्रस्ताव दिल्याचे बोलले जात आहे. याबाबत पत्रकारांनी मिलिंद नार्वेकरांना गाठून त्यांची प्रतिक्रिया घेण्याचाही प्रयत्न केला.**



मात्र नार्वेकरांनी हसून बोलणं टाळलं.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी मिलिंद नार्वे कर मातोश्री येथे निघाले होते. यावेळी वाटेत काही पत्रकारांनी त्यांना अडवलं आणि शिंदे गटाने दक्षिण मुंबईतून लढण्याचा प्रस्ताव दिल्याबाबत विचारणा केली. मात्र नार्वेकरांनी यावर कुठलीही प्रतिक्रिया देणं टाळलं. नार्वेकरांचं सूचक हास्य काय सांगतं, याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला जात होता. मिलिंद नार्वे करांच्या मौनांची भाषांतरं पत्रकार करत राहिले.

**महायुतीचा उमेदवार अद्याप अनिश्चित**

महायुतीकडून दक्षिण मुंबईत अद्याप उमेदवार देण्यात आलेला नाही. या जागेसाठी भाजप इच्छुक असून त्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी भाजप नेत्यांची बैठकही सागर बंगल्यावर घेतली होती. या जागेसाठी भाजपचे मंगलप्रभात लोढा, राहुल नार्वेकर, यशवंत जाधव हे निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. पण, अद्याप हा मतदारसंघ कोणाला सुटणार हे निश्चित नाही. त्यामुळे आता या जागेवर भाजप उमेदवार असणार की शिंदे येथून शिवसेनेच्या धनुष्यबाणावर नार्वेकर यांना रिंगणात उतरवणार, हे पाहावं लागेल.




# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# आधीचंच बरं होतं...

**नावीन्याची हौस साऱ्यांनाच असते. तंत्रज्ञानाच्या दुनियेत तर नावीन्यालाच किंमत आणि प्रसिद्धी. एक वर्ष जुनं हार्डवेअर असो की एक आठवडा जुनं ॲप, सगळ्यांसाठी एकच नियम आणि तो म्हणजे जुने जाऊ द्या मरणा लागुनि, जाळुनि अथवा पुरुनि टाका... नव्याचे नऊ दिवस या म्हणीचा प्रत्यय तंत्रज्ञानाइतका चपखल दुसऱ्या कुठल्याच क्षेत्राला लागू होत नसावा. नित्यनव्या निर्मितीमुळे काल- परवाचं गॅजेटही भंगारात जातं. पण मुद्दा असा आहे की, जे जे नवं ते ते हवं असं काही प्रत्येक वेळी होईलच असं नाही. म्हणजे अनेकदा कसं होतं की नवीन ॲप किंवा फोनचं मॉडेल घेतलं जातं. नवीन फीचर्सचा मोह आवरता न आल्याने किंवा गरज म्हणून ते आत्मसातही केलं जातं. पण मग कालांतराने असं वाटू लागतं की यापेक्षा आधी जे होतं तेच बरं होतं. काही वेळेला आधीच्या व्हर्जन किंवा प्रतिमध्ये जी फीचर्स, वैशिष्ट्यं होती ती नव्या गुणवैशिष्ट्यांपेक्षा अधिक उपयुक्त असतात. अशा वेळेस मग अडचण होऊन बसते. हार्डवेअरपेक्षा ॲप्सच्या बाबतीत हा प्रकार अनेकदा होतो. बहुतांश वेळा स्मार्टफोनमध्ये असलेले ॲप्स हे आपोआप अपडेट होतात. खरं तर ते तसे अपडेट व्हावेत असं सेटिंग केलेलं असतं म्हणूनच ते होतात.**

## ऑटो अपडेट बंद करा

गुगल प्ले स्टोअर उघडा. मेन्यूवर टॅप करा आणि सेटिंग्जमध्ये जा आणि ऑटो अपडेट ॲप्सवर क्लिक करा. जर का मोबाइल डेटाची काळजी वाटत असेल तर अपडेट ऑन वायफाय ओन्ली असा पर्याय असतो. त्यावर क्लिक करा. जी ॲप्स तुम्हाला ऑटोअपडेट व्हावीत असं वाटत असेल तर ती बघा. तिथे अलाऊ ऑटोमॅटिक अपडेटिंगवर क्लिक करा. ऑटोअपडेट नकोच असेल तर तसाही पर्याय तिथे दिलेला असतो.





## एपीके फाइल कशी मिळवाल?

एपीके फाइल मिळविण्यासाठीचा सर्वात लोकप्रिय आणि विश्वासू स्त्रोत म्हणजे एपीके मिरर ही वेबसाइट. ही वेबसाइट अप टू डेट असते आणि तिथे अनेक ॲप्सच्या वेगवेगळ्या व्हर्जन्सच्या एपीके फाइल्स सहज मिळतात. तुम्हाला हवं असलेलं ॲप आणि त्याच्या व्हर्जनचा नंबर शोधायचा आणि ती फाइल डाऊनलोड करायची. जर का स्मार्टफोनमधूनच ही फाइल डाऊनलोड केली असेल तर थेट इन्स्टॉल करता येऊ शकते. अन्यथा लॅपटॉप किंवा कम्प्युटरमधून स्मार्टफोनमध्ये ती फाइल कॉपी करा आणि मग इन्स्टॉल करा. झालं काम. अनेकदा जुनं व्हर्जन इन्स्टॉल केल्यानंतर लगेचच ते अपडेट व्हायला लागतं आणि हे होण्यामागचं कारण म्हणजे ऑटोअपडेट. त्यामुळे तो पर्याय बंद केला आहे की नाही हे पुन्हा एकदा तपासा. ज्या ॲपचं जुनं व्हर्जन इन्स्टॉल केलेलं आहे त्या विशिष्ट ॲपसाठी ऑटो अपडेटचा पर्याय बंद ठेवा.

## होईल सुरक्षेशी तडजोड

- एखादं ॲप आपल्या मर्जीनुसार अपडेट झालं तरी नंतर पूर्वीचंच बरं होतं असं वाटू शकतं. अशा वेळी काय करायचं? त्यासाठी एक मार्ग आहे. पण तो सांगण्यापूर्वी एक गोष्ट लक्षात असू द्या की, असं करणं स्तुत्य नाही. याचं कारण म्हणजे नवीन अपडेट्स हे फक्त फीचर्सपुरतेच मर्यादित नसतात, तर त्यासोबत सुरक्षेबाबतचेही अपडेट्स इन्स्टॉल होत असतात. त्यामुळे जुनं व्हर्जन पुन्हा इन्स्टॉल करण्याआधी ही बाब लक्षात असू द्या. पर्यायाने स्मार्टफोनच्या सुरक्षेशी तडजोड होण्याची शक्यता असते.
- जुनं व्हर्जन डाऊनलोड करण्यासाठी त्या ॲपची एपीके फाइल डाऊनलोड करावी लागते आणि ती फाइल ॲपस्टोअरमध्ये मिळत नाही. काही महिन्यांपूर्वी आलेला पोकेमॉन गो हा गेम अनेक देशांमध्ये लाँच झाला नाही. पण त्याची एपीके फाइल उपलब्ध असल्यामुळे ॲपस्टोअरमध्ये नसतानाही बहुतांश देशांमधली तरुणाई पोकेमॉन शोधत गावभर हिंडत होती. एक्स्टर्नल सोर्स म्हणजे इतरत्र कुठून तरी ती फाइल मिळवावी लागते.
- सर्वप्रथम अशा प्रकारची फाइल इन्स्टॉल करण्यासाठी मोबाइलकडून परवानगी लागते. ती मिळवण्यासाठी स्मार्टफोनच्या सेटिंग्जमध्ये सिक्युरिटीमध्ये जा आणि अलाऊ इस्टॉलेशन ऑफ अननोन ॲप्स हा पर्याय टिक करा किंवा निवडा. पुढची पायरी म्हणजे हव्या असलेल्या ॲपची एपीके फाइल मिळवणं.



# GPT-4 VISION नक्की आहे काय...

**कृत्रिम बुद्धीमत्ता अर्थात 'एआय' हा सध्या चर्चेत असलेला मुद्दा आहे. खासकरुन ओपन एआय कंपनीने (OpenAI) चॅट जीपीटी (ChatGPT) हे बाजारात आणल्यानंतर या साऱ्या मुद्यांवरची चर्चा अधिकच वाढली. अवघ्या काही महिन्यांपूर्वी वापरास उपलब्ध झालेले चॅट जीपीटी बघता बघता अनेकांच्या दैनंदिन वापराचा भागही झाले आहे. त्यामध्ये अगदी कमी कालावधीमध्ये प्रचंड गतीने विकास देखील होत आहे. सुरुवातीला आलेली चॅट जीपीटीची आवृत्ती ही निव्वळ मजकुरावर प्रक्रिया करू शकत होती. मात्र, आता त्यामध्ये नवनव्या सुविधा विकसित होत असून कृत्रिम बुद्धीमत्तेच्या जगतात अचाट करुन टाकणारे बदल होत आहेत. आता चॅट जीपीटीची अशीच एक नवीन आवृत्ती बाजारात आली आहे. DALL-E सोबत एकत्र आल्याने चॅट जीपीटी आता अगदी नेहमीच्या भाषेतून प्रॉम्प्ट (सूचना) दिल्यानंतर प्रतिमांची निर्मितीदेखील करू शकते.**

## जीपीटी -४ च्या प्रमुख क्षमता काय आहेत?

जीपीटी - ४ व्हीजनमध्ये छायाचित्रे, स्क्रीनशॉट आणि दस्तऐवजांसह दृश्य सामग्रीवर प्रक्रिया करणे यांसारख्या काही महत्त्वाच्या क्षमता समाविष्ट आहेत. या नव्या क्षमतांमुळे याला प्रतिमांमधील वस्तू ओळखणे आणि आलेख, तक्ते आणि दृश्यामधील इतर विदांचा अर्थ लावणे आणि विश्लेषण करणे यासारखी अनेक कार्ये करता येतात. जीपीटी - ४ व्हीजन प्रतिमांमध्ये समाविष्ट असलेल्या हस्तलिखित आणि मुद्रित मजकुराचादेखील अर्थ लावू शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रामधील ही एक महत्त्वाची झेप आहे. कारण ती दृश्यात्मक समज आणि मजकूराचे विश्लेषण यांच्यातील अंतर अधिकाधिक कमी करते.

## जीपीटी - ४ व्हीजनच्या मर्यादा काय आहेत?

ओपन एआयने हे मान्य केले आहे की, जीपीटी - ४ ने केलेली ही प्रगती नक्कीच अचूकता आणि विश्वासार्हतेच्या बाबतीत लक्षणीय झेप ठरते. मात्र, त्याने समोर ठेवलेले निष्कर्ष आणि विश्लेषण हे नेहमीच १०० टक्के अचूक आणि परिपूर्ण असतीलच असे नाही. कारण हे मॉडेलदेखील चुका करू शकते. त्यामुळेच त्याने प्रदान केलेले निष्कर्ष पुन्हा पडताळून पाहणे गरजेचे ठरते. प्रतिमांमधील विशिष्ट व्यक्तींची ओळख टाळण्यासाठी मॉडेलला प्रशिक्षित केले गेले आहे. यालाच ओपन एआय डिझाइनद्वारे 'रिफ्यूजल बिहेव्हिअर' असे म्हणतात. याच्या असलेल्या मर्यादा आणि विसंगती ओळखून कंपनीने काही सूचनाही केल्या आहेत. त्यामध्ये अचूक वैज्ञानिक, वैद्यकीय आणि संवेदनशील विषयांच्या विश्लेषणासाठी याचा वापर करू नये, असे त्यांचे म्हणणे आहे.

## जीपीटी -४ व्हीजन वापरकर्त्यांना कशाप्रकारे मदत करू शकते?

जीपीटी - ४ व्हीजन हे संशोधक, वेब डेव्हलपर, विदा विश्लेषक आणि 'कंटेट क्रिएटर्स'साठी एक सोयीचे साधन ठरू शकते. दृश्य क्षमतांचा वापर करून प्रगत भाषा मॉडेलिंगच्या मदतीने जीपीटी - ४ व्हीजनचा वापर शैक्षणिक संशोधनात, विशेषतः ऐतिहासिक कागदपत्रे आणि हस्तलिखितांचा अर्थ लावण्यात होऊ शकतो. अशाप्रकारची कामे वेळखाऊ असल्याने ती तज्ज्ञांच्या गटाद्वारे केली जातात. मात्र, जीपीटी - ४ हे काम सहजतेने करू शकते. विशेष म्हणजे ते वेळदेखील घेत नाही. अगदी काही सेकंदात ते निष्कर्ष आपल्यासमोर ठेवते. शिवाय त्यामधील अचूकता वाढवण्यासाठी वापरकर्ते त्याचे निष्कर्ष अनेक वेळा पडताळून घेऊ शकतात. त्याचप्रमाणे जीपीटी - ४ व्हीजनचा वापर करून वेब डेव्हलपर आता संकेतस्थळांसाठी फक्त डिझाइनच्या दृश्य प्रतिमेवरून कोड लिहू शकतात. मग ते त्यासाठी एखादी कच्ची रेखाकृतीदेखील वापरू शकतात. हे मॉडेल कागदावरील डिझाइन वाचून संकेतस्थळासाठी कोडची निर्मिती करण्यासाठी देखील सक्षम आहे. विदेचा अर्थ लावणे हा कामाचा महत्त्वाचा भाग ठरतो. त्यामध्येही हे मॉडेल आश्चर्यकारक पद्धतीने कार्य करू शकते. कारण हे मॉडेल दृश्य आणि चित्रात्मक गोष्टींचाही अर्थ लावू शकते आणि त्याचे विश्लेषण करू शकते. थोडक्यात, जीपीटी - ४ व्हीजन आणि DALL-E 3 चे एकत्रित संयोजन होण्यामुळे 'कंटेट क्रिएटर्स'ना समाजमाध्यमांसाठी आपली सर्जनशीलता अधिक वाढवण्यासाठी चांगलीच मदत होऊ शकते.

वापरकर्त्यांने सूचना दिल्यानंतर नव्याने एखादी प्रतिमा तयार करणे ही एक गोष्ट झालीच, मात्र त्यासोबतच एखादी जुनी प्रतिमाही त्याला पुरवली तर त्याचाही अर्थ उलगडण्याचे काम चॅट जीपीटीची नवी आवृत्ती करू शकते. उदाहरणार्थ, काहीवेळा एखाद्या जुन्या पुस्तकातील वा माहितीपत्रकावरील प्रतिमांचा अर्थ लावण्याची गरज भासते, तर तेही काम आता चॅट जीपीटीच्या नव्या आवृत्तीच्या वापरामुळे सोपे झाले आहे. कारण एकतर अशा एखाद्या प्रतिमेचे विश्लेषण करणे बरेचदा कठीण आणि वेळखाऊ काम असते. मात्र, आता 'जीपीटी – ४ व्हीजन'मुळे ते काम अगदी सहज आणि लीलया पार पडू शकते. सप्टेंबर २०२३ मध्ये, ओपन एआयने दोन नव्या सुविधा समाविष्ट केल्या होत्या. एक म्हणजे यामध्ये वापरकर्त्याला प्रतिमेबद्दल प्रश्न विचारता येऊ लागले आणि दुसरे म्हणजे प्रश्न विचारण्यासाठी बोलण्याची सुविधा देखील देऊ केली आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये, ओपन एआय कंपनीने द्रष्टेपणा दाखवत API च्या प्रवेशासह 'जीपीटी – ४ व्हीजन'ची घोषणा केली. आपण आता 'जीपीटी – ४ व्हीजन'च्या तंत्रज्ञानावर आणि त्याच्या मर्यादांवर देखील एक नजर टाकणार आहोत.

### प्रतिमा, मजकूर आणि ध्वनी...

- जीपीटी - ४ व्हीजन हे एक 'लार्ज मल्टीमोडल मॉडेल' (LLM) आहे. हे मूलतः असे एक मॉडेल आहे, जे मजकूर आणि प्रतिमा किंवा मजकूर आणि ध्वनी यांसारख्या अनेक पद्धतींमध्ये माहिती घेण्यास आणि त्यावर प्रक्रिया करून प्रतिसाद निर्माण करण्याची क्षमता बाळगून आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा विचार करता हा पहिला आणि एकमेव असा LMM नाही. CogVLM, LLaVA, Kosmos-2, इत्यादींसारखे इतरही अनेक LLM आहेत. LMM ला मल्टीमोडल लार्ज लँग्वेज मॉडेल (MLLMs) म्हणूनदेखील ओळखले जाते.

## जीपीटी -४ व्हीजन नक्की आहे तरी काय?

- 'जीपीटी - ४ व्हीजन' यालाच 'जीपीटी - ४ व्ही' असेदेखील संबोधले जाते. यामध्ये वापरकर्त्यांना प्रतिमांचे विश्लेषण करता येते. ओपन एआयच्या संशोधनात्मक अहवालानुसार, चॅट जीपीटीसारख्या मोठ्या भाषा मॉडेलमध्ये एखादी अतिरिक्त कृती करण्याची सुविधा मिळणे हे देखील एक मोठे पाऊल मानले जाते. त्यामुळे, आता त्यामध्ये प्रतिमा समाविष्ट करण्याची सुविधा प्राप्त झाल्याने हे नक्कीच एक मोठे यश आहे.
- जीपीटी - ४ व्हीजन हे चॅट बॉट मल्टीमॉडेल तयार करण्याच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल असल्याचे मानले जात आहे. यामध्ये प्रतिमा, मजकूर, ध्वनी यांचा वापर सहजपणे करता येऊ शकतो. यामध्ये वापरकर्त्यांना सूचना देण्यासाठी प्रतिमांचा वापर करता येऊ शकतो, तसेच त्याबद्दल प्रश्नही विचारता येऊ शकतात. या प्रक्रियेला 'दृष्यात्मक प्रश्नांची उत्तरे देण्याची प्रक्रिया' (Visual Question Answering - VQA) असे म्हणतात.

# सेन्सर काम करतं कसं?

**सध्या उपलब्ध असणाऱ्या सर्वच स्मार्टफोन्समध्ये सेन्सर्स आहेत. कुठलाही स्मार्टफोन हातात घेतला की त्याच्या फ्रंट कॅमेऱ्याच्या आजूबाजूला दोन- तीन लेन्ससदृश वर्तुळं असतात. ही वर्तुळं म्हणजे दुसरं- तिसरं काही नसून सेन्सर्स असतात. स्मार्टफोनमध्ये साधारण आठ- दहा वेगवेगळ्या प्रकारचे सेन्सर्स असतात. हे सेन्सर्स कुठले आणि त्यांचे काम काय, हे जाणून घेणे मोठे रंजक आहे.**

## प्रॉक्झिमिटी सेन्सर

स्मार्टफोनच्या स्पीकर्सच्या जवळ सामान्यतः हा सेन्सर्स असतो. याचे मुख्य काम म्हणजे स्मार्टफोनचा स्क्रीन हा आपल्या शरीरापासून किती जवळ आहे हे सांगायचे. जेव्हा आपण फोनवर बोलतो तेव्हा आपला कान आणि मोबाइलचा स्क्रीन यांच्यातले अंतर हा सेन्सर ताडतो आणि त्यानुसार स्क्रीनलाइट बंद करून बॅटरी सेव्ह करतो. स्क्रीनला बोलताना चुकून होणारा स्पर्श, चुकून दाबली जाणारी बटन्स यांना प्रतिबंध करण्याचे काम हा सेन्सर करतो. बॉडी प्रेझेन्स डिटेक्ट करत असल्यामुळे फोनवर बोलत असताना वेब सर्फिंग, म्युझिक किंवा व्हिडीओ बंद होते आणि बॅटरी वाचते. तसेच संभाषण संपले की या गोष्टी पुन्हा सुरू होतात.

## ॲम्बियन्ट लाइट सेन्सर

भोवताली असणारा नैसर्गिक प्रकाश ताडून त्यानुसार स्क्रीन लाइटची तीव्रता कमी- जास्त करण्याचे महत्त्वाचे काम ॲम्बियन्ट लाइट सेन्सर करतो. अनेक स्मार्टफोन्स, टॅब्लेट तसेच लॅपटॉपमध्येही हा सेन्सर असतो. प्रकाशाच्या उपलब्धतेनुसार डिस्प्ले ब्राइटनेस आपोआप ॲडजस्ट होतो. या सेन्सरमध्ये फोटो डायोड्स असतात. जे प्रकाशाच्या विविध स्पेक्ट्रम प्रति संवेदनशील असतात. त्यांच्या एकत्रित परिणामानुसार हे डायोड्स ॲडजस्ट होतात. त्यानुसार स्क्रीनचा ब्राइटनेस कमी-जास्त होतो.

## ॲक्सिलरोमीटर

सर्वाधिक माहीत असलेला आणि वापरला जाणारा असा हा सेन्सर आहे. फोन आडवा केला की स्क्रीन डिस्प्ले आडवा होणे आणि उभा केला की पूर्ववत होणे हे ज्यामुळे शक्य होते तो हा सेन्सर. फोनच्या ओरिएंटेशननुसार डिस्प्ले बदलण्यासाठी हा सेन्सर कारणीभूत असतो. कॅमेऱ्याच्या आडव्या आणि उभ्या होण्यासाठीही हाच सेन्सर मदत करतो. टेम्पल रन असो किंवा इतर कुठलेही रेसिंग गेम्स सहजरीत्या खेळले जातात ते याच सेन्सरमुळे. फोनची तिन्ही अंशांमध्ये म्हणजेच एक्स, वाय आणि झेड ॲक्सिसमध्ये होणारी हालचाल टिपून त्यानुसार डिस्प्ले बदलला जातो.

## फिंगरप्रिंट सेन्सर

सध्याच्या बऱ्याचशा स्मार्टफोन्समध्ये असणारा हा लोकप्रिय सेन्सर आहे. आयफोनने ही संकल्पना आणल्यानंतर इतर सर्वच स्मार्टफोन्स कंपन्यांनी ती अवगत केली. फोन लॉकिंग, अनलॉकिंगपासून ते फोल्डर्स लॉकिंग- अनलॉकिंगपर्यंत सगळीकडेच हे सेन्सर उपयुक्त ठरतंय. स्वाइप राइट करून पॅटर्न किंवा पासवर्ड टाकण्याऐवजी फिंगरप्रिंटवरून अनलॉक करणं सोपं ठरलंय. हा सेन्सर म्हणजे असं एक डिव्हाइस आहे जे फिंगरप्रिंट पॅटर्नची डिजिटल इमेज कॅप्चर करतं. जेव्हा जेव्हा बोट स्कॅनरवर ठेवलं जातं तेव्हा त्याचे एक बायोमेट्रिक टेम्प्लेट बनवले जाते आणि ते स्टोअर करून मॅचिंगसाठी वापरले जाते. याशिवाय मॅग्नेटोमीटर, बॅरोमीटर, थर्मामीटर, होकायंत्र, पेडोमीटर, हार्ट रेट मॉनिटर असे एकापेक्षा अनेक सेन्सर्स विविध प्रकारच्या स्मार्टफोन्समध्ये उपलब्ध असतात. काही सेन्सर्स हे एकटे काम करतात तर काहींसाठी एकापेक्षा दोन सेन्सर्स एकत्रित वापरले जातात. उदाहरणार्थ, मोबाइलमधल्या होकायंत्रासाठी लोहचुंबकाचा वापर करता येत नाही. कारण त्यामुळे कम्युनिकेशनला बाधा येऊ शकते. अशावेळी उत्तर किंवा दक्षिण दिशेकडून येणाऱ्या लो फ्रिक्वेन्सी सिग्नलला डिटेक्ट केले जाते आणि मग ॲक्सिलरोमीटरच्या साहाय्याने फोनचे ओरिएंटेशन आणि त्यावरून दिशा काढली जाते. थोडक्यात ॲप्स आणि इतर सॉफ्टवेअर्सबरोबरच या स्मार्ट सेन्सर्समुळे स्मार्टफोनची कार्यपद्धती उजवी ठरते. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने स्मार्ट बनतात.



# एसीचे योग्य प्रकारे व्यवस्थापन

**सध्या उन्हाळा सुरू आहे. त्यामुळे घरातला एसी कायम सुरू राहत असेल. अशावेळी तुमच्या वीजबिलाचा आकडा नेहमी जास्तच असतो. मात्र एसीचा वापर करूनही वीजबिल आटोक्यात ठेवण्यासाठी व ऊर्जा बचत करण्यासाठी काही उपाययोजना फायदेशीर ठरू शकतात...**



## स्टार्स वीज वाचविण्यात सहाय्यभूत

रूम एअर कंडिशनर्स खरेदी करताना ग्राह्य धरण्यात येणारा हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. बहुतांश ग्राहक एसी खरेदी करताना किमतीला भुलतात. मात्र प्रत्यक्ष एसी घरात बसविल्यावर येणाऱ्या वीजबिलाचा विचार करत नाहीत. एसीवरील स्टार्स हे कमीतकमी २ वर्षांमध्ये तुमची खरेदी किंमत शक्य तितकी कमी करण्यास मदत करतात.

- कूल मोड : कूल मोड नॉर्मल मोड आहे; जेव्हा एअर कंडिशनर सेट केलेले तापमान आणि सेट केलेल्या फॅन स्पीडवर चालतो. यात ऊर्जा बचत शक्य आहे आणि ती सेट केलेल्या तापमानावर अवलंबून आहे.
- फॅन मोड : फॅन मोडमध्ये फॅन सतत चालू राहतो आणि कॉम्प्रेसर बंद राहतो. निश्चितच यामुळे ऊर्जा बचत होते. कारण कॉम्प्रेसर बंद राहतो, जो सर्वाधिक ऊर्जा वापरतो.
- ड्राय मोड : पावसाळ्यासारख्या जास्त आर्द्रतेच्या दिवसांत हा मोड योग्य आहे. समुद्राजवळ राहणाऱ्या लोकांकरिता हा मोड जास्त महत्त्वाचा आहे. पावसाळ्यात हवेचे तापमान खूपच कमी असते, आर्द्रता कमी झाल्यामुळे रूममध्ये या मोडवर एसी ठेवल्याने घरात चांगली हवा खेळती राहते म्हणूनच ड्राय मोडमध्ये एअर कंडिशनर चालू केल्यामुळे हवेतील जास्तीची आद्रता कमी होण्यामध्ये मदत होते. कारण कूल मोडच्या तुलनेत फॅन कमी वेगाने चालतो आणि कॉम्प्रेसर खूपच कमी काळासाठी चालू राहतो. यामुळे ऊर्जेचा वापर कमी होण्यामध्ये मदत होते. इथे हवा शुष्क करण्याचा उद्देश असतो, रूम थंड करण्याचा नाही.
- स्लीप मोड : स्लीप मोड तापमान 2 अंशापर्यंत वाढेपर्यंत प्रत्येक एका तासानंतर १ अंशद्वारे सेट केलेले तापमान वाढवतो. त्यानंतर एअर कंडिशनर आणखी ६ तास चालतो. यामुळे वीज बचत होते.
- अनेकदा एसी घेताना आपल्यासमोर वीजच्या वाढत्या बिलाचे चित्र समोर उभे राहते. परंतु एसी काळजीपूर्वक वापरल्यास तुम्हाला आरामदायी थंड हवाही मिळेल आणि वीजबिलही वाढणार नाही.

## शॉर्ट न्यूज

### धुम स्टाईल चोरी करणारे दोघेजण गजाआड

■ **राहुरी :** सुमती संजय दिघे या राहुरी तालूक्यातील राहुरी खुर्द येथे रहावयास आहेत. त्या व त्यांचे पती संजय दिघे हे दोघे मोटारसायकलवर राहुरी खुर्द येथून विद्यापीठकडे जात होते.तेव्हा पाठीमागुन मोटरसायकलवर आलेल्या दोन भामट्यांनी सुमती दिघे यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसकावुन धूम ठोकली होती. राहुरी पोलिस पथकाने आरोपी अर्जुन हिरामण गोर्डे व महेश दत्तात्रय गवारे, दोघे रा. अशोक नगर, ता. श्रीरामपूर यांना सापळा लावून पकडले. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक धर्मराज पाटील हे करीत आहे.

### संजीवनीच्या सहा अभियंत्यांची फेथ निवड

■ **कोपरगाव :** संजीवनी के. बी. पी. पॉलिटेक्निकच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने काळाची गरज ओळखून मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या नवोदित अभियंत्यांना ऑटोमेशन या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित केले व कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन केले. यात फेथ ऑटोमेशन या भारतातील व परदेशातील वाहन निर्मिती कंपन्यांसाठी इंडस्ट्री ४. ० या प्रणालीनुसार कार्य करणाऱ्या स्वयंचलित रोबोटिक लाइन्स डिझाइन सोल्युशन देणाऱ्या अग्रगण्य कंपनीने सहा नवोदित अभियंत्यांची डिझाइन इंजिनिअर या पदावर निवड केली आहे.

### खाजगी जमिनीवर अतिक्रमण: गुन्हा दाखल

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील लिंपणगाव येथील खासगी मालकीच्या अतिक्रमण जमिनीवर केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शेतमालक बापू बाबा माने (रा. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष माणिक भोंडवे, किरण भिकाजी भोंडवे, प्रवीण सोपान कूरुमकर, बापू लशमन कूरुमकर, सागर भिकाजी भोंडवे, प्रशांत संतोष भोंडवे, ताराबाई माणिक भोंडवे, मनीषा संतोष भोंडवे सर्व (रा. लिंपणगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) यांच्या विरोधात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मानवी कलाकृतीतून मतदार जागृतीचा संदेश

■ **शेवगाव :** तालुक्यातील गोळेगाव येथील संत भगवानबाबा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवी कलाकृती तयार करून मतदान जागृतीचा संदेश दिला. मतदारांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये शंभर टक्के सहभाग घेऊन लोकशाही सक्षम आणि सुदृढ करण्याच्या उद्देशाने मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी मानवी कलाकृती तयार करून मतदान जागृतीचा संदेश दिला.

### मीनानाथ पांडेंची भविष्यात उणीव भासेल

■ **अकोले :** तालूक्यातील विकासाची कामे मार्गी लावण्यासाठी नेहमी पाठपुरावा करून प्रश्न सोडवून घेणारा हुशार कार्यकर्ता हरपला. त्यांचे जाण्याने मला व्यक्तिशः खूप दुःख झाले. मिनानाथ पांडे सारख्या अभ्यासू कार्यकर्त्याची भविष्यात उणीव भासेल अशी भावना माजी मंत्री मधुकरराव पिचड यांनी व्यक्त केली. अकोले ताक्यातील ज्येष्ठ पाटपाण्याचे अभ्यासक स्व. मिनानाथ पांडे यांचे नुकतेच अकाली दुःखद निधन झाले. मधुकरराव पिचड व माजी आमदार वैभवराव पिचड यांनी पांडे यांच्या निवासस्थानी जावून त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

# हिवरे बाजारचे काम संत विचारांचे प्रतिबिंब

## ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे प्रतिपादन



**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**आदर्श गाव हिवरे बाजार येथे शिलांश स्थापना निमित्ताने ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून श्रीरामकथा आयोजनाचे ५ व्या दिवशी ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज मोरे अध्यक्ष जगद्गुरू श्री.संत तुकाराम महाराज संस्था देहू यांनी हिवरे बाजार भेटीत सांगितले कि हिवरे बाजारचे काम हे संत विचारांचे प्रतिबिंब आहे.**

पुढे बोलताना ते म्हणाले,श्री.संत तुकारामांची अभंगवाणी वृक्ष, मृदा आणि जल संरक्षणाचे महत्त्व सांगणारे अनेक अभंग श्री संत तुकारामांनी लिहीले आहे. वृक्ष वल्ली आम्हा सोयरे, वनचरे जल बुद्धी वेचुनिया शास्त्री उदक चालवावे युक्ती असे वैचारिक साधन संपत्तीचा संदेश देणारे अनेक अभंग तुकाराम गायले आहेत. हे अभंग कृतिशीलतेने साकार करणारे हिवरे बाजार देशातले एकमेव गाव असल्याचे मला दिसले. गावचा काना कोपरा वृक्ष वल्लीने नटलेला आहे. पावसाचा प्रत्येक थेंब भगवंताचा प्रसाद मानून गावाने अडविला आहे. गाव स्वच्छ आहे, गावकऱ्यांची मने निर्मळ आहेत. निर्वेसनी आहेत, गावात समानता आहे.

आपल्या संतानी सुख, शांतीची पाऊलवाट दाखवलेली आहे.त्या वाटेवरून हिवरे बाजार चालत आहे.याचा मला विशेष आनंद आहे.असे मनोगत देहू संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी राम कथा सप्ताह निमित्ताने हिवरे बाजारला भेट दिली असता व्यक्त केले त्यांच्या समवेत पंढरपुरच्या देहू संस्थानाचे प्रमुख ह.भ.प.शिवाजी महाराज मोरे व ह.भ.प.माणिक गोविंद मोरे होते.

दुष्काळाचे चटके संत तुकाराम व त्यांचे परिवाराला सोसावे लागले.''बरे केले देवा निघाले दिवाळे '' हा अभंग दुष्काळातून निर्माण झपाट्याने दुःखा बाबत आहे.संत तुकाराम महाराजांनी शेतकऱ्यांना पहिली कर्ज माफी दिली.आज पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली हिवरे बाजार करांनी दुष्काळ हटवून शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले.हे संत तुकारामांचे काम हिवरे बाजारने केल्याचे ह.भ.प.शिवाजी महाराज मोरे व माणिक गोविंद मोरे यांनी सांगितले.हिवरे बाजार परिवारातर्फे सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# नगर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी

## तरतुदींचे पालन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहरासह जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियमचे कलम ३७ (१) व ३७ (३) नुसार १७ ते ३० एप्रिलपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे.**

नगर जिल्ह्यात सभा, महासभा, आंदोलनाच्या काळात अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी १७ ते ३० एप्रिलपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. या आदेशानुसार शस्त्रे, भाले, दंडुके, बंदुका आदी वस्तू बाळगण्यास, तसेच पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई आहे. हा आदेश शासकीय व्यक्तींना ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे. त्यांना लागू होणार नाही. तसेच प्रेतयात्रा, धार्मिक कार्यक्रम, मिरवणूका, लग्न समारंभासाठी ज्यांनी संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक तथा सहायक पोलीस निरीक्षक यांची रीतसर परवानगी घेतली आहे, अशा व्यक्तींना हा आदेश लागू राहणार नाही.

# अब की बार भाजप तडीपार...!

## ■ संविधान आणि देश वाचवण्यासाठी भाजपला रोखावंच लागेल ■ आदित्य ठाकरेंचे परभणीकरांना आवाहन

**परभणी : प्रतिनिधी**

**संविधान आणि देश वाचवायचा असेल तर भाजपाला रोखावं लागेल असे आवाहन युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी परभणीकरांना केले आहे. परभणीतील घनसावंगीमध्ये पार पडलेल्या सभेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह आदित्य ठाकरे हेही उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते. त्यांनी भाषणात भाजपवर जोरदार टीकास्त्र डागले आहे.**



**अच्छे दिन काही आले नाही**

यावेळी आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला आहे. परभणीत सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा पार पडली. त्यानंतर आदित्य ठाकरे म्हणाले, सकाळी मोदींची सभा झाली आणि या मतदारसंघात अवकाळी पाऊस झाला. गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू असून शेतकरी हवालदिल झाला आहे.२०१४ आणि २०१९ मध्ये अच्छे दिन येणार असं सर्वांना वाटत होतं, मात्र अच्छे दिन काही आले नाही, असा टोला आदित्य यांनी लगावला.

**कमळाला चिखलच लागते**

पुढे आदित्य ठाकरे म्हणाले, हुकूमशाही वाढत गेली. त्यामुळे भाजपाला आता किती दिवस डोक्यावर बसवायच? म्हणून आम्ही मविआ सरकार आणले, पण आमच्यातील चाळीस गद्दार झाले. त्यांनी चिन्ह चोरले, नाव चोरले, पण यामुळे उद्धव ठाकरे यांच्यावर जनतेचे प्रेम आणखी वाढत गेले. आज राज्यात तोडफोडीचे आणि चिखल फेकीचे राजकारण सुरू आहे. पण कमळाला चिखलच लागते, अशी टीका आदित्य ठाकरेंनी केली.

**अब की बार भाजप तडीपार**

आदित्य पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील ४८ जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार जिंकून येतील. एवढंच नाहीतर दिल्ली आणि पंजाबमध्ये आप जिंकणार आहे. भाजपच्या ४०० सोडा २०० जागा सुद्धा येणार नाहीत. अब की बार भाजप तडीपार, असा नारा आदित्य ठाकरे यांनी यावेळी दिला.

**संविधान वाचवण्यासाठी भाजपाला रोखावं लागेल**

भाजपच्या चारशे पारच्या नाऱ्यावर आदित्य ठाकरे म्हणाले की, भाजपाला संविधान बदलायचा आहे, म्हणून त्यांना ४०० जागा पाहिजेत. भाजप संविधान आणि आंबेडकर विरोधी आहे. भाजपाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान नको, त्यांना नवीन संविधान पाहिजे आहे. आज देश हुकूमशाहीकडे चालला आहे. त्यामुळे संविधान वाचवायचं असेल, देश वाचवायचा असेल तर भाजपाला रोखावं लागेल, असे आवाहन आदित्य ठाकरे यांनी मतदारांना केले.

# २३ जागांचा निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाला चारच जागा मिळतात ही शोकांतिका - अमोल कोल्हे

**पुणे : प्रतिनिधी**



**२३ जागांचा निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाला चारच जागा मिळतात ही शोकांतिका आहे असे म्हणत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. तसेच सर्व्हेनुसार त्या चार जागाही अजित पवार गट जिंकु शकणार नाही असेही ते म्हणालेत.**

**कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असणे स्वाभाविक**

महायुतीच्या जागावाटपात केवळ चारच जागा अजित पवार गटाला सुटल्या. यानंतर अजित पवार गटात नाराजी असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यावर अमोल कोल्हे यांनी भाष्य केले आहे. अमोल कोल्हे म्हणाले की, खरं तर हा त्यांच्या पक्षातील अंतर्गत प्रश्न आहे. कुठल्याही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अशा प्रकारच्या नाराजी असणे स्वाभाविक आहे. कारण जे नेतृत्व एकेकाळी २३ जागांचे निर्णय घेऊ शकत होते त्यांना अवघ्या आता चार जागा मिळतात. ही परिस्थिती लोकसभेला असेल तर विधानसभेला काय परिस्थिती असेल हा संभ्रम कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होणे स्वाभाविक आहे, असे मत अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.

**एक उमेदवारी घरात द्यावी लागली**

तसेच पुढे अमोल कोल्हे यांनी महायुतीमध्ये या चार जागांवरही अजित पवार गटाचा विजय होणार नाही असे म्हटले आहे. ते म्हणाले, महायुतीची खूप मोठी घसरण होणार आहे. सर्व्हेमध्ये ज्या चार जागा अजित पवार गटाला मिळाल्या त्यावर त्यांचा विजय होणार नसल्याचे चित्र आहे. तसेच ज्या जागा मिळाल्या आहेत त्या चार जागांवर एक उमेदवारी घरात द्यावी लागली तर एक पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांना जागा लढवावी लागत आहे. तर उर्वरित दोन जागांवर उमेदवार आयात करावे लागले, असा टोला अमोल कोल्हेंनी लगावले.

# अमरावतीकरांनो मला माफ करा !

## ■ नवनीत राणांना उमेदवारी देऊन चूक झाली होती ■ ज्येष्ठ नेते शरद पवार यांची कबुली

**अमरावती: प्रतिनिधी**



**गत लोकसभा निवडणुकीत आमच्या पक्षाने इथल्या अपक्ष उमेदवाराला (नवनीत राणा) पाठिंबा दिला होता. त्या उमेदवारासाठी मी अमरावतीत प्रचार सभा घेतल्या. लोकांनी माझा संदेश स्वीकारला आणि आम्ही ज्यांना पाठिंबा दिला, त्यांना खासदार केले. परंतु मागील ५ वर्षांचा त्यांचा कार्यकाळ पाहता माझी चूक झाली असे मला वाटते. अमरावतीकरांनी मला माफ करावे आणि झालेली चूक दुरूस्त करावी, असे ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले.**

अशी चूक माझ्याकडून होणार नाही असे सांगत नवनीत राणा यांचा पराभव करा, असे आवाहन पवार यांनी मतदारांना केले. याआधी खासदारकीचा राजीनामा देऊन भाजपमध्ये गेलेल्या उदयनराजेंच्या पोटनिवडणुकीवेळी देखील शरद पवार यांनी सातारकरांची माफी मागितली होती. त्यावेळी साताऱ्याच्या जनतेने पवारांच्या आवाहनाला भरभरून प्रतिसाद देऊन श्रीनिवास पाटील यांना विजयी केले. त्यानंतर आता अमरावतीकर काय करणार याकडे सगळ्यांचे लक्ष असेल.

अमरावती लोकसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारार्थ ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक, माजी मंत्री यशोमती ठाकूर यांची सभा संपन्न झाली. नवनीत राणा यांचा मागील ५ वर्षांच्या कार्यकाळावर मविआ नेत्यांनी जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारला विविध योजनांवरून धारेवर धरले. तर शरद पवार यांनी भाषणाच्या सुरूवातीलाच नवनीत राणांना उमेदवारी देणे ही चूक होती, अशी जाहीर कबुली दिली.









# टाळ मृदुंगाच्या गजरात वधू वरची सप्तपदी!

**■ डीजेला फाटा देत वारकरी संप्रदायाची जोपासना ■ वधू-वराची पारंपरिक पद्धतीने मंडपामध्ये आगमन ■ लोणी हवेली येथे अनोखा विवाह सोहळा संपन्न**



पारनेर : प्रतिनिधी

**लग्न सोहळा म्हटलं की डीजे, ब्रास बँड आणि त्याच्यावर थिरकणारी तरुणाई, त्याचबरोबर लग्न घटिका टळून जाणे हे जणू का एक स्टेटस सिम्बॉलच बनला आहे. मात्र या सर्व धांगडधिंगाला फाटा देत तालुक्यातील लोणी हवेली येथे वधू-वरांनी टाळ मृदुंगाच्या गजरामध्ये सप्तपदी केली. मंडपामध्ये त्यांचे अशाप्रकारे पारंपारिक व आध्यात्मिक पद्धतीने स्वागत करून कोल्हे व दिवटे परिवाराने एक आदर्श वस्तूपाठ घालून दिला. या अनोख्या विवाह सोहळ्याचे उपस्थित मान्यवरांनी एक प्रकारे कौतुक केले.**

लग्न सोळा संस्कारांपैकीपंधरावा संस्कार आहे. वर वधू नातेवाईक आणि अग्नी यांचा साक्षीने पती पत्नी म्हणून संबद्ध होतात त्या संस्काराला विवाह असे म्हणतात.

ते ब्रह्मचर्याश्रम,अवस्थेतून गृहस्थाश्रम, मध्ये प्रवेश करतात. दोन जीवांचे मिलन असणाऱ्या या संस्काराला एक अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. त्यामुळे लग्न सोहळा एक विस्तीर्ण स्वरूप अलीकडच्या काळामध्ये प्राप्त झाले आहे. हौसेला मोल नसते त्याप्रमाणे लग्न समारंभामध्ये मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची प्रथा पडली आहे. मेहंदी, हळदी आणि मुख्य सोहळा त्यानंतर वरात अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम या निमित्ताने आयोजित केले जातात. धन दांडग्यांबरोबरच मध्यमवर्गीय सुद्धा यासाठी मोठा खर्च करतात. वर आणि वधूच्या मिरवणुकीसाठी डीजे लावला जातो. लग्नाच्या अगोदर वर मुलाच्या मिरवणुकीमध्ये या वाद्याच्या तालावर करवले, मित्रपरिवार आणि गावातील तरुण थिरकतात. मद्य प्राशन करून अक्षरशः धांगडधिंगाचे स्वरूप प्राप्त होते.

## मंगलाष्टकांना संगीताचा लय सुर ताल!

**लोणेश्वर माध्यमिक विद्यालयात संपन्न झालेल्या विवाह सोहळ्यामध्ये ह .भ. प गणेश महाराज शेंडे यांनी संगीतबद्ध केलेल्या मंगलाष्टका गाण्यात आल्या. त्याला लय सूर आणि ताल असल्याने वातावरण भर उन्हामध्ये मंगलमय आणि उत्साहवर्धक दिसून आले.**

## सत्काराला बगल देत मंदिराला वर्गणी!

**रविवारी पार पडलेल्या लग्न समारंभामध्ये उपस्थित मान्यवरांचा सत्कार टाळण्यात आला. त्यामुळे वेळ आणि पैशाची बचत झाली. तेच पैसे वधू पिता युवराज कोल्हे यांनी मंदिरासाठी देणगी दिली. त्यांनी या माध्यमातूनही एक आदर्श गावापुढे घालून दिला.**

त्यामुळे लग्न घटिका टळुन जाते.

कित्येकदा दोन ते तीन तास डीजेच्या नादामध्ये विलंब होतो. यातून कधीकधी वाद तंटे निर्माण होतात. मोठ्या आवाजाने अनेकांना त्रास होतो. ध्वनी प्रदूषणाला निमंत्रण दिले जाते. त्यामुळे मंगलमय सोहळ्याला कित्येकदा गालबोट लागण्याची शक्यता असते. त्याचबरोबर डीजेला हजारो रुपये मोजावे लागतात. काही काही ठिकाणी लाखो रुपयांची सुपारी दिली जाते. वऱ्हाडी मंडळींना ताटकळत थांबावे लागतेच. लहान मुले आणि वयोवृद्धांना त्रासाला सामोरे जावे लागते. अक्षदा रुपी आशीर्वाद देण्यासाठी आलेले अनेकदा नाराज होतात. तरुणाई वगळता इतरांनाही डीजे संस्कृती नको असते. मात्र युवा पिढीच्या आग्रहाखातर डीजेला पाचरण करावे लागते. या सर्व पार्श्वभूमीवर रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी तालुक्यातील लोणी हवेली येथे संपन्न झालेल्या विवाह सोहळ्यामध्ये डीजेला फाटा देण्यात आला. आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असणाऱ्या लोणी येथील युवराज कोल्हे

**लोणी हवेली हे महानुभाव पंथीय गाव आहे. या ठिकाणी भगवान श्रीकृष्णाचे मंदिर आहे. त्याचबरोबर मोठा मठ सुद्धा आहे. पंचक्रोशी बरोबरच बाहेरील गावातूनही अनेक भाविक या ठिकाणी येतात. त्यामुळे लोणीला एक अध्यात्मिक आणि वैचारिक अधिष्ठान आहे. या पार्श्वभूमीवर आमचे मित्र वधू पिता युवराज कोल्हे आणि वर पक्षाकडून डीजेला फाटा देऊन वारकरी संप्रदायाची जोपासना करत टाळ मृदुंगाच्या गजरात वधू-वराचे मंडपामध्ये स्वागत करण्यात आले. अशाच प्रकारचा कित्ता समाजाने लग्न सोहळ्यामध्ये गिरवावा असे आवाहन करीत आहोत.**

**दौलत सखाराम शिंदे**
निवृत्त अधिकारी,लोणी हवेली

यांची कन्या चि.सौ.कां. स्वाती व रुई छत्रपती येथील स्वर्गीय भास्कर संभाजी दिवटे यांचे चिरंजीव अतुल यांच्या शुभविवाहाची संपूर्ण तालुक्यामध्ये चर्चा झाली. याचे प्रमुख कारण म्हणजे वधूवराच्या स्वागतासाठी चक्क टाळ मृदुंग हाती घेऊन हरिनामाचा गजर करणारे बाल वारकरी निमंत्रित करण्यात आले होते.

वारकरी शिक्षण संस्था पिंपळनेर येथील ह.भ.प.गणेश शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. या मंगलमय सोहळ्यामध्ये हरिनामाचा जप करत टाळ मृदुंगाच्या तालावर वारकरी शिक्षण संस्थांच्या विद्यार्थ्यांनी ठेका धरत वातावरण भक्तिमय केले. दोन्ही बाजूचे वऱ्हाडी अक्षरशा मंत्रमुग्ध झाले. कडक उन्हामध्ये या आध्यात्मिक उपक्रमाने उपस्थितांच्या मनाला एक प्रकारे गारवा दिला.

# चैत्रातच सूर्य आग ओकतोय ; चिंता वैशाख वनव्याची !

**■ शिरुर, पारनेर तालुक्यात वन्यप्राण्यांना मोठी झळ**
**■ उघड्या बोडक्या माळरानावर सावलीसाठी धडपड**

शिरूर : सतीश डोंगरे

**तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. यंदा चैत्र महिन्यातच वैशाख वणव्याप्रमाणे सूर्य आग ओकत असल्याने वन्यप्राण्यांसह माणसे आणि पशुपक्ष्यांच्या जिवाची काहिली होत आहे. वन्यप्राणी तुटपुंज्या सावलीच्या झाडांचा आश्रय घेत सावलीत विसावत असल्याचे चित्र शिरुरसह पारनेर तालुक्यात पाहावयास मिळत आहे.**

यंदा मार्च महिना उजाडताच सूर्याने आग ओकण्यास सुरवात केली असून, उन्हाच्या प्रखरतेसोबतच पाणीटंचाईनेही उग्ररूप धारण केले आहे. कडाक्याचे ऊन व पाणीटंचाईमुळे शेतशिवार ओस पडले आहे. पाणगळीमुळे सर्वत्र निसर्गराजा उनाड-बोडखा पडला आहे. निष्पर्ण वृक्ष, उघडी बोडकी माळराने व काही ठिकाणी तळ गाठलेल्या विहिरींचे चित्र सर्वत्र दृष्टीस पडत आहे. उन्हामुळे शेतीकामापासून दुकानदार, व्यावसायिकापर्यंत सर्वांनाच फटका बसला आहे. माणसं थंड हवेची उपकरणे बसवून गारवा घेत असली, तरी वन्यप्राणी आणि पशुपक्षी, गुराढोरांना निष्पर्ण वृक्षाशिवाय पर्याय नाही. अनेक ठिकाणी भारनियमनाच्या नावाखाली दिवस-रात्र वीज गायब होत असल्याने नागरिकांना उकाडा असह्य होत आहे. सर्वत्र शीतपेयांची दुकाने गर्दीने फुलली असून, शीतपेयधारक कोल्डच्या नावाखाली अधिक कमाई करून ग्राहकांना गार करत आहेत.



उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारी महामार्ग, सर्व रस्ते निर्मनुष्य होत असून, एकूणच अघोषित संचारबंदीचा अनुभव सर्वत्र पाहावयास मिळत आहे. चहाऐवजी शीतपेयांना पसंती वाढल्याने पाहुणचार महागडा वाटत आहे. पत्र्याच्या घरात उकाडा असह्य होत असल्याने अनेकांनी पत्र्यावर तुराट्या, सरमाड, कागद पुढे टाकून गारव्याचा पर्याय शोधला आहे. चारा आटोपल्याने रखरखत्या उन्हात भटकंतीपेक्षा सावलीत विसाव्यासाठी वन्यप्राणी, जनावरे, गुराखी धाव घेत आहेत. सध्या बाभळी आणि कडूलिंबाच्या झाडाशिवाय कोठेच सावली उपलब्ध नसल्याने वन्यप्राण्यांसह पशुपक्षी, शेतकरी, गुरे, शेतमजूर निष्पर्ण बाभळीच्या तसेच कडूलिंबाच्या आश्रयास येत आहेत. पारनेर तालुक्यात हरणांचे कळप पाण्याच्या शोधार्थ भटकंती करतांना दिसत आहेत.

## वन्य प्राण्यांसाठी बांधावर पाणी ठेवा !

**तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे, वर्षीच्या तुलनेत यंदा तापमान जास्त आहे. तीव्र उन्हाळ्यामुळे नैसर्गिक जलस्रोत लवकरच आटल्याने वन्यप्राण्यांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. वन्यजीव पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे धाव घेऊ लागले आहेत. शेतकरी बांधवांनी वन्यजीव वाचविण्यासाठी शेताच्या बांधावर वन्य प्राण्यांसाठी पिण्याचे पाणी ठेवण्यासाठी सहकार्य करून आपल्या राष्ट्रीय संपत्तीचे जतन व संवर्धन करावे, असे आवाहन शिरुर वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**

अनेक ठिकाणी असे कळप एखाद्या तुटपुंज्या झाडाच्या सावलीत विसावताना दिसून येत आहेत.यंदा तापमानाची प्रखरता सर्वाधिक असून, वन्यप्राण्यांना उन्हाची दाहकता पोटाच्या दाहकतेपेक्षा जड वाटत आहे. रानोमाळ भटकंती करूनही पोटासाठी काही सापडत नाही. त्यात पाण्याचेही दुर्भिक्ष्य दुपारी बारा नंतर वन्यप्राणी दाट सावली असलेल्या झाडांकडे धाव घेऊन सायंकाळी पाचपर्यंत विसावा घेतात.

# शिरसुलेच्या खंडेश्वराच्या यात्रोत्सवास मंगळवारपासून प्रारंभ

निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील निघोज परिसरातील शिरसुले येथील ग्रामदैवत श्री खंडोबा देवाची यात्रा मिती चैत्र पौर्णिमा मंगळवार दि . २३ रोजी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे अशी माहिती समस्त ग्रामस्थ, शिवमल्हार ग्रुप शिरसुले यांनी दिली आहे.**

शिरसुले ग्रामदैवत यात्रा कार्यक्रम रुपरेषा पुढीलप्रमाणे मंगळवार दि. २३ रोजी पहाटे ५.०० ते ६.३० वाजता. श्री हनुमान जन्मोत्सव व भजन पाठ,सकाळी ८.०० ते ९.३० देवाचे




मांडव डहाळे व ढोल लेझीम नृत्य, सायं ५.४५ ते ६.४५ वा देवाची महाआरती आणि गावशिव मिरवणूक, सायं ६.४५ ते ७.१५ वाजता यात्रा मुख्य आकर्षण देवाचे बारा गाडे ओढणे सोबत फटाक्यांची आतिषबाजी सायं ७.१५ ते ७.४५ वाजता महाप्रसाद वाटप , सायं ८.३० ते ९.०० वाजता वाजत गाजत तळी भंडार उधळण, रात्री १०.३० वा देविभोयरे खंडोबा पालखी आणि ग्रामदैवत पालखी भेट, रात्री ११.०० ते २.०० वाजता मानाची काठी व पालखी मिरवणूक आणि ढोल-लेझीम नृत्य होणार आहे.

या यात्रेसाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ, शिवमल्हार ग्रुप, जयमल्हार क्रांती संघटना शिरसुले, देविभोयरे खंडोबा मंडळ यांनी केले आहे..

# निघोज येथे मंगळवारी हनुमान जन्मोत्सव

**भक्तीगीतांच्या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन**

निघोज : प्रतिनिधी



**मंगळवार दि.२३ रोजी हनुमान जन्मोत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन निघोज ग्रामस्थ व पवनपुत्र हनुमान मंडळ यांनी केले आहे.**

सोमवार दि.२२ रोजी रात्री सात ते नऊ सामुदायिक हनुमान चालीसा पठण यासाठी मंडळाचे मार्गदर्शक राजेंद्र उनवणे व बांधकाम व्यावसायिक विलासराव हारदे यांना संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक २२ रोजी रात्री नऊ वाजता कलारत्न पुरस्कार प्राप्त टि व्ही स्टार कलाकार कोमल सावंत प्रस्तुत भावगीत व भक्तीगीत यांचा अनोखा संगीतमय कार्यक्रम असलेल्या कोमल संगीत रजनीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

मंगळवार दि.२३ रोजी अभिषेक, पहाटे पाच ते सात शिवाजी महाराज बोऱ्हाडे यांचे किर्तन यावेळी यावेळी नाथाबुवा खराडे,नंदू महाराज वराळ, तुषार महाराज लाळगे, गणेश महाराज वरखडे, सुकाळे महाराज, कुशाभाऊ पठारे, पोपट महाराज तनपुरे आदी तसेच श्रीराम भजनी मंडळ उपस्थित राहून साथ करणार आहेत. कै. सुमनबाई निवृत्ती उनवणे यांच्या स्मरणार्थ उनवणे परिवार व संतोष दुतारे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गेली अनेक वर्षांपासून हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम संपन्न होत असून हनुमान मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन निघोज ग्रामस्थ व पवनपुत्र हनुमान मंडळ यांनी केले आहे.

# भगवान महावीरांची शिकवण सामाजिक कल्याणासाठी

**नीलेश लंके यांचा शोभायात्रेत सहभाग**

नगर : प्रतिनिधी

**भगवान महावीर जयंती निमित्त रविवारी (दि.२१) सकाळी नगरमधून शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभा यात्रेत नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी सहभागी होत सर्व नगरकरांना शुभेच्छा दिल्या.**

भगवान महावीर जयंती निमित्त कापडबाजारातील जैन स्थानक येथून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती. कपडाबाजार, खिस्त गल्ली, बंगाल चौकी, जुनी वसंत टाकी, मार्केट यार्ड मार्गे आनंद धाम येथे ही शोभा यात्रा पोहचली. तेथे जैन मुनींनी सर्वांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा देत भगवान महावीरांच्या जीवन



कार्याची माहिती दिली. या संपूर्ण शोभायात्रेत नीलेश लंके हे सहभागी झाले होते. आनंदधाम येथे त्यांनी आचार्य आनंद ऋषी महाराजांचे दर्शन घेत जैन मुनींचे आशीर्वाद घेतले.

यावेळी बोलताना लंके म्हणाले भगवान महावीर यांची शिकवण ही सामाजिक कल्याणासाठी असून प्रत्येकाने ती आत्मसाद केली पाहिजे. भगवान महावीर हे त्याग, करूणा आणि संवेदनशीलतेचे प्रतिक आहेत. त्यांची संयम, सदाचार, करुणा आणि अहिंसा ही शिकवण समाजाच्या कल्याणासाठी आहे. यामुळे ही शिकवण प्रत्येकाने आत्मसात केली तर प्रत्येकाचे जीवन सुखकर होईल.

यावेळी त्यांच्या समवेत माजी महापौर भगवान फुलसौंदर, शिवसेनेचे शहर प्रमुख संभाजी कदम, योगीराज गाडे, विशाल वालकर, किशोर श्रीमाळ, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# देव देवतांच्या मूर्ती मंदिराबरोबर ज्ञानाची मंदिरेही उभारावीत

**बालयोगी गणेशनाथजी महाराज यांची अपेक्षा**

पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी



**धार्मिक साधना जप,तप,श्रद्धा अर्पण करणेसाठी मानवाने देव-देवतांच्या मूर्ती मंदिराची निर्मिती अनादी काळापासून केली आहे.आजच्या कलियुगात पुरातन मंदिराचे जीर्णोद्धार आणि नवीन मूर्ती मंदिराची उभारणी मानवाकडून होत आहे.त्याचबरोबर आधुनिक युगात ज्ञानाची मंदिरेही उभारली जावीत अशी अपेक्षा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील गोरक्षनाथ मठाचे अधिपती बालयोगी गणेश नाथजी महाराज यांनी व्यक्त केली.**

पिंपळगावरोठा येथील जय मल्हार विद्यालयाचे नवीन शाळा इमारतीचे बांधकामाला नुकतेच भेट देऊन पाहणी करून गणेशनाथ महाराजांनी आशीर्वाद पर मार्गदर्शन केले.याप्रसंगी गणेश महाराज शिंदे उदापूर,संतोष भाकरे गुरुजी, संस्थेचे सचिव ॲड.श्री पांडुरंग गायकवाड ,विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम सुंबरे , भगवंत भांबरे, नाईक संतोष घुले,नानाभाऊ भांबरे, शिवाजी उमाप व भक्तगण,ग्रामस्थ,उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानाशिवाय काहीही प्राप्त होऊ शकत नाही.ज्ञान प्राप्त करण्याची साधना म्हणजे सरस्वतींचे मंदिर म्हणजे शाळा होय. ज्ञानासाठी शाळेच्या या नवीन इमारत बांधकामासाठी सर्व स्तरातील मानवांनी यथाशक्ती मदत शाळेला करावी या दानातून पुण्यप्राप्ती व्हावी असे आशीर्वाद श्री मठाधिपती यांनी दिले.शाळेच्या वतीने श्री महाराजांचा शाल,श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

# उद्योगपती मच्छिंद्रशेठ लंके हे सर्वसामान्य जनतेचे आधारवड - गणेशशेठ कटारिया

निघोज : प्रतिनिधी

**कन्हैय्या दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके हे सर्वसामान्य जनतेचे आधारवड असून राज्यातील लाखो लोकांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून देत हजारो व्यवसायिकांना व्यवसायात स्थिरस्थावर करीत कन्हैय्या दूध उद्योग समूह माध्यमातून राज्याला उद्योग विश्वात देशात नावलौकिक मिळवून देण्याचे योगदान कन्हैय्या दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांनी दिले असल्याचे प्रतिपादन सुनिती ज्वेलर्सचे मालक तथा व्यापारी असोसिएशनचे मार्गदर्शक गणेशशेठ कटारिया यांनी व्यक्त केले आहे.**

रविवार दि.२१ रोजी कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वे सर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांचा वाढदिवस उत्साहात साजरा झाला. दिवसभरात राज्यातील मान्यवरांनी भ्रमणध्वनी माध्यमातून त्यांचे अभिष्टचिंतन केले तसेच शिरूर व पारनेर तालुक्यातील तसेच अहिल्यागगर व पुणे जिल्ह्यातील बहुसंख्य मान्यवरांनी प्रत्यक्ष कन्हैया दूध उद्योग कार्यालयात येऊन त्यांचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले.



**कन्हैय्या दूध उद्योग समूहात दिवसभर वाढदिवसाची धूम होती सकाळी दहा पासून ते रात्री उशिरापर्यंत मान्यवर वाढदिवस शुभेच्छा देण्यासाठी येत होते. कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांना प्रत्यक्ष भेटून अनेक नव उद्योजकांनी त्यांचे मार्गदर्शन घेण्याची संधी घेतली. सोशल मीडीयात तर हजारोंच्या संख्येने शुभेच्छुक वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होते.**

यावेळी सुनिती ज्वेलर्सचे मालक व व्यापारी असोसिएशनचे मार्गदर्शक गणेशशेठ कटारिया यांनी विठ्ठल रखुमाई मुर्ती देऊन लंके यांना सन्मानित केले. पारनेर तालुका पत्रकार संघ व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांनी लंके यांचा सत्कार केला. तसेच संजीवनी डेअरी फार्मचे अध्यक्ष संकेत लाळगे यांनी दूध व्यवसायातील नव उद्योजकांच्या वतीने त्यांचा सत्कार केला.

यावेळी संजीवनी डेअरी फार्मचे संचालक विशाल जगदाळे, उद्योजक विनय कोंडीभाऊ लंके, व्यवसायीक ज्ञानेश्वर लंके आदी उपस्थित होते. संजीवनी डेअरी फार्मचे अध्यक्ष संकेत लाळगे यावेळी म्हणाले गेली २५ वर्षात पारनेर व शिरूर तालुक्यातील युवकांना दूध व्यवसायात सातत्याने पाठबळ देत दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ दिले देणारे एक उद्योगपती म्हणून मच्छिंद्रशेठ लंके यांनी नावलौकिक मिळविला. माझ्यासारख्या असंख्य युवकांना मार्गदर्शन करीत नोकरी पेक्षा व्यवसाय किती श्रेष्ठ आहे हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांनी केले यावेळी उद्योजक विनय लंके यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com